**<u>न्यायदंडाधिकारी वर्ग १ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.</u>**

नि.फौ.खटला क्र. ६६/२०२५

नि.क्र. १८

## दोषारोपपत्र

**मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की,**

आरोपीचे नाव – ०१. **संभाजी पांडुरंग महाडीक**,
**वय** – ७३ वर्षे, **व्यवसाय** – व्यवसाय,

०२. **उमेश संभाजी महाडीक**,
**वय** – ४७ वर्षे, **व्यवसाय** – व्यवसाय व शेती,

०३. **अमेय संभाजी महाडीक**,
**वय** – २८ वर्षे, **व्यवसाय** – व्यवसाय,

०४. **राजाराम बाबी महाडीक**,
**वय** – ५९ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,
**<u>आरोपी क्र. ०१ ते ०४ राहणार</u>** –
धामापुरतर्फे संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

०५. **रुपेश राजेंद्र खेडेकर**,
**वय** – २६ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,

०६. **राजेंद्र शिवराम खेडेकर**,
**वय** – ५२ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,
**<u>आरोपी क्र. ०५ व ०६ राहणार</u>** –
चिपळुन, शिंदेवाडी, ता. चिपळुन, जि. रत्नागिरी.

०७. **सुधाकर गणपत महाडीक,**
**वय** – ६५ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,
**राहणार** – पंतनगर, घाटकोपर,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

तुम्ही आरोपी क्रमांक ०१ ते ०७ यांनी दिनांक २५/०४/२०२५ रोजी दुपारी १२:१५ वाजताच्या दरम्यान शिवधामापुर, भेलेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या अनाधिकृत जमाव जमविला व सदर जमावाचे तुम्ही सर्व सदस्य होता, त्याद्वारे, तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १८९ (२) अन्वये**, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

दुसरे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. ०१ ते ०७ यांनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या अनाधिकृत जमाव जमवून दंगा केला, त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १९१ (२) सह कलम १९० अन्वये**, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

तिसरे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. ०१ ते ०७ यांनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या अनाधिकृत जमाव जमवून हातात चिव्याची व लाकडी काठी घेवुन दंगा केला, त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १९१ (३) सह कलम १९० अन्वये**, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

चौथे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. ०१ ते ०७ यांनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या अनाधिकृत जमाव जमवून हातात चिव्याच्या बांबूची लाकडी काठी घेवुन दंगा करुन *फिर्यादी – देवदास बबन महाडीक* यांना

चिव्याची व लाकडी काठीने डोक्यावर व हातावर मारहान करुन इच्छापूर्वक दुखापत केली, त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८ (१) सह कलम १९०** अन्वये, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

पाचवे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. ०१ ते ०७ यांनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या अनाधिकृत जमाव जमवून हातात चिव्याच्या बांबूची लाकडी काठी घेवुन दंगा करुन *फिर्यादी नामे – देवदास बबन महाडीक* व *साक्षीदार – अक्षय देवदास महाडीक* यांना हाताच्या थापटाने, लाथा बुक्क्यांनी कानावर, हातावर मारहान करुन इच्छापूर्वक दुखापत केली, त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११५ (२) सह कलम १९०** अन्वये, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

शेवटचे असे की, उपरोक्त वेळी, तारखेस व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. ०१ ते ०७ यांनी गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या अनाधिकृत जमाव जमवून हातात चिव्याच्या बांबूची लाकडी काठी घेवुन दंगा करुन *फिर्यादी – देवदास बबन महाडीक व फिर्यादी यांचा मुलगा – अक्षय देवदास महाडीक* यांना ''तुम्ही दिसाल त्या ठिकाणी तुम्हाला खल्लास करुन टाकू'' अशी धमकी देवुन फौजदारी धाकदपटशा दाखविला, म्हणून तुम्ही त्याद्वारे, **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३५१ (२) सह कलम १९० अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात दखलपात्र गुन्हा केला.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.**

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.08.22 18:10:13 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – २२/०८/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**<u>प्रमाणपत्र</u>**

आरोपींना त्यांच्या मातृभाषेत आरोप पत्रातील मजकूर त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.08.22 18:10:19 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – २२/०८/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 22/08/2025 |
| Charge signed by PO. on | :- | 22/08/2025 |
| Charge uploaded on | :- | 22/08/2025 |